**औरंगाबाद महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा उपविधी-२०११ ला शासनाची मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगरविकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: औमपा-२०१३/प्र.क्र.१३/२०१३/नवि-२४,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक- ६ फेब्रुवारी, २०१४.**

**वाचा:-** १) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांचे पत्र क्र.मनपा/उअ/पापु/जास्था/२९३/२०१२, दि.५/७/२०१२.

२) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांचे पत्र क्र.मनपा/उअ/पापु/जास्था/७५२/२०१४, दि.८/१/२०१४.

३) आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांचे पत्र क्र.मनपा/उअ/पापु/जास्था/७५७/२०१४, दि.१३/१/२०१४.

४) औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण ठराव क्र.४४१, दि.७/९/२०११.

**प्रस्तावना:-** औरंगाबाद महानगरपालिका यांनी पाणीपुरवठा व पाणीपट्टी उपविधी- २०११ च्या प्रारूप मसुद्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र.४४१, दि.७/९/२०११ अन्वये मान्यता प्राप्त करून दि.११/१०/२०११ रोजी दैनिक लोकमत, औरंगाबाद टाईम्स, उर्दू या वृत्तपत्रात जाहिर प्रसिध्दी देवून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. मुदतीमध्ये एकही हरकती सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तद्नंतर औरंगाबाद महानगरपालिका पाणीपुरवठा व पाणीपट्टी उपविधी-२०११ चा अंतीम मसुदा राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी दि.२८/१/२०१३ च्या पत्रान्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४६१ नुसार मान्यता देऊन याच अधिनियमाचे कलम ४६२ नुसार शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी मान्यता देण्याचे प्रस्तावित केले होते.

औरंगाबाद महानगरपालिकेने पाणीपुरवठा योजना राबविण्या संदर्भात संदर्भधिन पत्रान्वये सादर केलेला प्रस्ताव व महानगरपालिकेने पारित केलेला संदर्भाधिन ठराव विचारात घेवून औरंगाबाद

महानगरपालिकेने सादर केलेल्या पाणीपुरवठा व पाणीपट्टी उपविधी-२०११ ला मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

औरंगाबाद महानगरपालिकेने सादर केलेल्या ह्या शासन निर्णया सोबतच्या पाणीपुरवठा व पाणीपट्टी उपविधी-२०११ च्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४६१ अन्वये राज्य शासनाची मान्यता देण्यात येत आहे. सदर उपविधी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

गो. आ. ल

**(गो.आ.लोखंडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन,**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ३२.
२) प्रधान सचिव, नवि-२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग, जि.औरंगाबाद
४) आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद, जि.औरंगाबाद.
५) सह सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सह सचिव, नवि-३३ /उप सचिव, नवि-२० /नवि-२६/, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) माहिती व तंत्र संचालनालय, मंत्रालय, मुंबई (वेबसाईटवर प्रसिध्दी करिता).
८) निवड नस्ती (नवि-२४) (२ प्रती).

F/Ajit/G.R.